आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

९ मार्च २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सरकार लक्ष ठेवत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी दक्ष असल्याचं परराष्ट्र मंत्र्यांचं संसदेत निवेदन

- विरोधकांनी केली लोकसभेत चर्चेची मागणी/ गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज ३ वाजेपर्यंत स्थगित

- पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमतींमधे वाढ

- देशभरात आरोग्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- आयसीसी टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव/ भारताच्या नावे ३ विक्रमांची नोंद

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामकाजाला आजपासून सुरुवात झाली. राज्यसभेत माजी सदस्य मुकुल रॉय, डॉ. जनार्दन वाघमारे आणि एच. के. दुआ यांना सर्व सदस्यांनी  श्रद्धांजली वाहिली. पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सरकार लक्ष ठेवत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी दक्ष असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आज राज्यसभेत आपल्या निवेदनात म्हणाले. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊनच संबंधित मंत्रालयं समन्वयाने काम करत आहेत. तसंच, पश्चिम आशियातला तणाव कमी करण्यासाठी सरकारकडून राजनैतिक प्रयत्न सुरूच राहतील, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.  इराणमध्ये प्रवास करू इच्छिणाऱ्या भारतीयांना सरकारने जानेवारी महिन्यातच याबाबतचा सल्ला दिला होता आणि त्यांना भारतीय दूतावासात नोंदणी करायला सांगितल्याचं डॉ. जयशंकर यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही संयुक्त अरब अमिराती, कतार, सौदी अरेबिया, ओमान, जॉर्डन, इस्त्रायल आणि बहरीनच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा केली आणि त्यांना शांततेचं आवाहन

केलं आहे, अशी माहितीही जयशंकर यांनी सभागृहाला दिली. आखाती देशांमध्ये सुमारे १ कोटी भारतीय राहतात. उर्जा सुरक्षा, खनिज तेल आणि वायू पुरवठ्यासाठी हे देश महत्त्वाचे असून ते भारताचे प्रमुख व्यापारी भागीदारही आहेत. त्यामुळे या वाढत्या संघर्षाचा परिणाम जहाज वाहतुकीवर आणि पर्यायाने सामान्य जीवनावर होत असल्याचं जयशंकर यांनी यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर चर्चेच्या मागणीवरून विरोधी सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब झालं. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्राला आजपासून सुरुवात झाली. परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर निवेदन देण्यासाठी उभे राहिले. मात्र, तेव्हा विरोधकांनी सरकारविरोधी घोषणा देत पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर चर्चेची मागणी केली. विरोधकांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांना सरकारकडून सविस्तर उत्तरं दिली जात आहेत. सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव कार्यक्रम पत्रिकेवर असताना विरोधक पश्चिम आशियावर चर्चेची मागणी करत असल्याची टीका पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी केली. या गदारोळातच परराष्ट्र मंत्र्यांनी निवेदन सादर केलं. मात्र, त्यानंतर देखील विरोधकांच्या घोषणा सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज तीन वाजेपर्यंत तहकूब झालं.

तत्पूर्वी आज सकाळी कामकाज सुरू झाल्यावर दिवंगत नेत्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शिलाँगचे विद्यमान खासदार आणि व्हॉइस ऑफ द पीपल पार्टीचे नेते डॉ. रिकी अँड्र्यू जे. सिंगकॉन तसंच, कुमारी सुशीला त्रिरिया, देवी बक्स सिंग, पूर्णमासी राम आणि के.पी. उन्नीकृष्णन या चार माजी सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमतींमधे वाढ झाली आहे. होर्मुझमार्गे वाहतूक बंद झाल्याने पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, तसंच युद्ध स्थितीमुळे कुवैत आणि संयुक्त अरब अमिरातींसारख्या देशांनी खनिज तेल उत्पादन आणि निर्यातीत कपात केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सध्या कच्च्यातेलाचं मूल्य प्रतिबॅरल ११०

डॉलर्सच्या पुढे गेलं आहे. गेल्या सात दिवसात या दरात ५५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे.

<><><><><>

राज्यसभेच्या आगामी द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपचे अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज केंद्रीय निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या आहेत.  बिहारमध्ये छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा आणि केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा पक्ष निरीक्षक असतील तर हरियाणामध्ये गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, ओदिशामध्ये महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची पक्ष निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

<><><><><>

देशभरात आरोग्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्या असून जनतेच्या आकांक्षा हा अर्थसंकल्पाचा पाया आणि सरकारची जनतेसाठीची वचनबद्धता असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते 'सबका साथ सबका विकास' या धोरणाअंतर्गत अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करत होते. आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमांतून विविध ठिकांणी आरोग्य सेवांचा विस्तार झाला आहे, याचा उल्लेख त्यांनी केला.

….. **होल्ड बाईट- प्रधानमंत्री - - -**

भविष्यात मुलींना तंत्रज्ञानात समान संधी मिळाव्यात आणि तरूण संशोधकांना नवोन्मेष आणि नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहित करणारी एक मजबूत संशोधन परिसंस्था निर्माण करणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग आणि कॉमिक्स या क्षेत्राच्या प्रगतीकडे लक्ष दिलं जाणार आहे. तसंच शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या कॅम्पसमध्ये उद्योग व्यवसायात सहकार्य आणि संशोधनावर भर देणाच्या गरजेकडे लक्ष दिल्यास विद्यार्थ्यांना वास्तविक जगाचे अनुभव मिळतील असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

दिल्लीतल्या कथित उत्पादनशुल्क घोटाळ्यात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया आणि इतर २१ जणांना निर्दोष मुक्त करण्याच्या निर्णयाला सीबीआयने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. न्यायमूर्ती स्वर्ण कांत शर्मा यांनी केजरीवाल, सिसोदिया आणि इतर प्रतिवादींकडून त्यावर जबाब मागितला आहेय पुढची सुनावणी येत्या १६ मार्चला ठेवली आहे.

**<><><><><>**

इस्राएली फौजांनी बैरूटमधे लेबनॉनच्या लष्करी ठाण्यांवर केलेल्या हल्ल्यात ५ वरिष्ठ अधिकारी मारले गेल्याचं इस्राएलच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितलं आहे. या लक्ष्यवेधी हल्ल्यात खतम अल् अनबिया या संघटनेचं मुख्यालय उद्ध्वस्त झालं असून त्यांचा प्रमुख अबु अल कासम बाबाइयान मारला गेल्याचंही या सूत्रांनी सांगितलं. ही संघटना इराणमधे दहशतवादी कारवायांसाठी माणसं पुरवत होती, असं इस्राएलचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जागी त्यांचे पुत्र मोजताबा खामेनी यांची निवड झाली आहे. दरम्यान, इराणच्या कोणत्याही उत्तराधिकाऱ्याला लक्ष्य करण्यात येईल अशी धमकी इस्रायलने दिली आहे.

**<><><><><>**

विश्वविजेत्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विजयासाठी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. तीन वेळा विश्वविजय केल्याबद्दल भारतीय संघाचं अभिनंदन. भारतीय संघाचा प्रत्येक खेळाडू, त्यांचे सहकारी आणि व्यवस्थापकीय कर्मचारी यांचं कौतुक करावं तितकं कमी असल्याचं राष्ट्रपती आपल्या संदेशात म्हणाल्या आहेत. तर हा विश्वचषक जिंकून भारतीय संघाने हे सिद्ध केलंय की दृढनिश्चय, संयम आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश मिळवता येतं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले आहेत. गेल्या दोन वर्षांत भारताच्या विविध क्रिकेट संघांनी सहा विश्वचषक पटकावल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. विश्वचषक जिंकल्याबद्दल आज लोकसभा आणि राज्यसभेतही भारतीय संघाचं अभिनंदन करण्यात आलं. भारतीय संघाने आपलं कौशल्य, सांघिक कामगिरी आणि शिस्तीच्या बळावर हा विजय मिळवल्याचं लोकसभेत पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल म्हणाले. तर विश्वचषकाच्या या संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाच्या उत्कृष्ट कामगिरीचा देशभरातल्या लाखो क्रिकेटप्रेमींना अभिमान वाटतो आहे, अशा शब्दांत उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यसभेत भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. महाराष्ट्र विधिमंडळातही आज भारतीय संघाचं अभिनंदन करण्यात आलं.

**<><><><><>**

भारताच्या टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक विजयाचा जल्लोष सर्वत्र सुरू आहे. काल अहमदाबाद इथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव केला आणि विश्वविजेते पदावर तिसऱ्यांदा नाव कोरलं. प्रथम फलंदाजी करत, भारताने सलामीवीर संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, ईशान किशन आणि शिवम दुबे यांच्या झंझावाती फलंदाजीच्या जोरावर २० षटकांत ५ बाद २५५ धावा केल्या. मात्र, न्यूझीलंडच्या संघाला या धावांचा पाठलाग करता आला नाही. अक्षर पटेलने तीन तर जसप्रीत बुमराहने ४ गडी बाद करत न्यूझीलंडच्या फलंदाजीला खिंडार पाडलं. हार्दिक पांड्या, वरुण चक्रवर्ती आणि अभिषेक शर्मा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. त्यामुळे न्यूझीलंडचा सगळा संघ १९व्या षटकात फक्त १५९ धावा करू शकला. चार षटकांत १५ धावा देत चार बळी घेणारा बुमराह सामनावीर ठरला, तर संजु सॅमसन मालिकावीर ठरला.

या विजयासह भारताने टी-ट्वेंटी क्रिकेट प्रकारात तीन विश्वविक्रम केले. टी-ट्वेंटी विश्वचषक सलग दोन वेळा जिंकण्याचा, मायदेशात विश्वचषक जिंकण्याचा तर तीन वेळा विश्वविजेता ठरण्याचा असे तीन विश्वविक्रम भारताच्या नावावर नोंदले गेले आहेत.

//<><><><><>//